# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०४/२०२६ (गुरूवार )**

---

## पोलीस स्टेशन केळवद अप क्रं १२३/२०२६ बाबत...

पोलीस स्टेशन केळवद अप क्रं १२३/२०२६ च्या समांतर तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने **१) करणसिंग जगसिंग भादा, वय २५ वर्षे, २) संगमसिंग जगदीशसिंग बावरी, वय ४९ वर्षे, दोन्ही रा शात्री वॉर्ड कबाडी मोहल्ला पांढुर्णा, राज्य मध्य प्रदेश आणि ३) नितेश रमेश गायकवाड, वय २९ वर्षे, रा बामणी बस स्टॉप जवळ, पांढुर्णा, मध्य प्रदेश यांना निष्पन्न करून पांढुर्णा येथुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली होती.** यासंबधात काही वृत्तपत्रा द्वारे स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईवर संशय व्यक्त करण्यात आला होता. या प्रकरणाची श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सविस्तर चौकशी केली आहे. सदर प्रकरणामध्ये सर्व बाजुंनी सखोल चौकशी करण्यात आली असुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची तपासकामी रवानगी, स्टेशन डायरीच्या नोंदी, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे स्थानिक पोलीसांसोबत समन्वय, स्थानिक पोलीस स्टेशनच्या स्टेशन डायरी नोंदी यांची सखोल तपासणी करण्यात आली. सदर प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने योग्य प्रकारे तसेच कायदेशिररित्या कारवाई केल्याचे दिसुन आले. दिनांक ०९/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने **वर नमुद तिन आरोपींना** निष्पन्न केले. तसेच दिनांक १०/०४/२०२६ रोजी केळवद पोलीसांनी त्यांना अटक करून दिनांक ११/०४/२०२६ रोजी मा. न्यायालयात हजर केले. मा. न्यायालयाच्या आदेशात **Accused have no complaint of ill treatment at the hands of Police** असे स्पष्ट नमुद केले आहे.

**नमुद तिन्ही आरोपी हे सराईत व सवयीचे गुन्हेगार आहेत. त्यापैकी आरोपी क्र. १ याच्या विरूध्द मध्यप्रदेशातील पांढुर्णा, मुलताई व महाराष्ट्रातील चंद्रपुर, अमरावती, वर्धा आणि नागपुर (ग्रा.) जिल्हयात एकुण ७३ गुन्हे नोंद असुन, आरोपी क्र. २ वर सुध्दा महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यात दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, चोरी असे एकुण ८१ गुन्हे गुन्हे नोंद आहे तसेच क्रं ३) नितेश रमेश गायकवाड याचेवर १८ गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपींना विविध गुन्हयांमध्ये प्रोडक्शन वॉरंट ने ताब्यात घेवुन त्यांचा पोलीस कोठडी रिमांड घेण्यात येत असुन अजुन गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे. तसेच नमुद आरोपी हे टोळीने गुन्हे करण्याच्या सवीयीचे असल्याने नमुद आरोपीतांच्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम ( MCOCA ) अन्वये कारवाई करणे प्रस्तावित आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

**पोलीस स्टेशन नरखेड :—** दिनांक १६/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन नरखेड हद्दीमधील शिवनी ते नरखेड जाणाऱ्या रोडवरील ग्राम मौदी दळवी शिवार येथे नाकाबंदी केली असता संशयीत टाटा कंपनीचा १० चक्का टिप्पर क्र. एम एच—४०/डी सी— २५९९ मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. सदर वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, **टिप्पर चालक नामे विक्रम नरेंद्र इंगळे, वय ३१ वर्ष, रा. शिरसावाडी, ता. काटोल, जि. नागपूर** अशी माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी आरोपी चालकाकडील रेती वाहतूकीच्या परवान्याची तपासणी केली असता वाहनात परवान्यापेक्षा जास्त रेती वाहतुक करीत असल्याचे निदर्शनास आले. वाहन चालकास मालकाचे नाव विचारले असता **मालक नामे राहुल जनार्दन भिसे, वय ४० वर्षे, रा. सावरगाव, जि. नागपूर** याचे सांगणेवरून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करीत असल्याची माहिती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद १० चक्का टिप्पर क्र. एम एच–४०/डी सी–२५९९ किंमती ५०,००,०००/– रूपये २) ०५.६७ ब्रास रेती किंमती २८,३५०/– रूपये असा एकुण ५०,२८,३५०/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी चालक १) विक्रम नरेंद्र इंगळे, वय ३१ वर्ष, रा. शिरसावाडी, ता. काटोल, जि. नागपूर २) राहुल जनार्दन भिसे, वय ४० वर्षे, रा. सावरगाव, जि. नागपूर, याच्या विरूध्द पोस्टे नरखेड येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०३ गुन्हे नोंद. एकुण ५६४०/– रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक १५/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन वडोदा, रामटेक यांनी अवैधरित्या सट्टापट्टी खेळणाऱ्या तसेच ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य, ५२ ताशपत्ते व रोख रक्कम असा एकुण ५६४०/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे आहेत.

पोलीस स्टेशन वडोदा अंतर्गत मौजा सावळी फाटा येथे **आरोपी क्र. १) विशाल राजू गोखे, वय २७ वर्ष, रा. राधेशाम शाळा जवळ नागपूर २) गणेश बलीराम चंद्रवंशी, वय २० वर्ष, रा. चिखली कळमना नागपूर** हे कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असताना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी २८८०/— रूपये असा एकुण २८९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.दोन्ही आरोपींवर महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये प्रत्येकी १ असे दोन गुन्हे नोंद करण्यात आले.

तसेच पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत कवनोद कुंभरे यांचे शेतातील सिमेंटचे शेडमध्ये उमरी रामटेक येथे **आरोपी नामे १) विनोद कवडू कुंभरे, वय ५३ वर्ष, २) दुर्गेश रामभाउ पंधरे, वय ३२ वर्ष, ३) शिवराम सदाशिव सर्याम, वय ५० वर्ष, ४) प्रविण हिराचंद भलावी, वय ४० वर्ष ५) रामचंद जेटूजी शेरकुरे, वय ३५ वर्ष, पाचही रा. उमरी, ता. रामटेक ६) बबन सुखदेव ठाकरे, वय ५५ वर्ष, मुसेवाडी, ता. रामटेक ७) विनोद सुखदेव धुवे, वय ४० वर्ष, रा. मुरडा, ता. रामटेक ८) राजू आसाराम मरस्कोल्हे, वय ३८ वर्ष, रा. नवेगाव, ता. रामटेक** हे लोकांकडुन पैसे घेवुन ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. आरोपीतांचे ताब्यातून ५२ ताशपत्ते व नगदी २७५०/—रूपये असा एकुण २७५०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींवर महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या,आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

दिनांक १५/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू तसेच वाहन असा एकुण ६२८८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे महादेव चोखीनाथ वंजारी, वय ४२ वर्ष, रा. वाकी याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे राजू लक्ष्मण मोदरकर, वय ४२ वर्ष, रा. ब्राम्हणी, ता. कळमेश्वर, ह. मु. गळपुरा काटोल, त. काटोल याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) हेमराज रामचंद्र देउळकर,

रा. वार्ड नं. ५, नरखेड जि. नागपूर २) दिलीप रामचंद्र वलके, वय ४० वर्ष, रा. वार्ड नं. ३, नरखेड ३) संदिप बाबुलाल देशमुख, वय २७ वर्ष, रा. चोरखैरी, तह. नरखेड याचेवर प्रत्येकी १ असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) अनिल भानुदास सोनोने, वय ३० वर्ष, रा. खरबडी, ता. नरख**ेड २**) दिलीप काशीराम खजुरिया, वय ३३ वर्ष, रा. मायवाडी, ता. नरखेड याचेवर प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे १) तुलाराम, तुळशिराम, चाचरकर, वय ६० वर्ष, रा. वार्ड नं. ४ कुही, ता. कुही, जि. नागपूर २) शैलेश युगराज कावळे, वय ३२ वर्ष, रा. माझरी, ता. कुही, जि. नागपूर याचेवर प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन बुट्टीबोरी** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, अशा ११ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ११ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ५४ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ३७८० मिली देशी दारू तसेच वाहन असा एकुण ६,२८८/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने